भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०२/२०१८

**१) बेकायदेशिर रित्या गोहत्या करून मास विक्री करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०२/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने स्वत:चे आर्थीक लाभा करीता बेकायदेशिर रित्या गोहत्या करून मास विक्री करतांना मिळुन आला त्यांचे जवळुन अंदाजे ५ किलो गौ जातीचे मास कि. ४५०/रु. वजन काटा कि. २६०/रु. तसेच गोहत्या करण्याकरीता २ लाल रंगाचे गौवंश जातीचे जनावरे कि. ६,५००/रु. असा एकुन ७२८०/रु. चा माल जवळ बाळगतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गाडवे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ भादवी. सहकलम ५,५(क),९,९(अ) महा. प्रा. संरक्षण अधीनियम १९७६ सन २०१५ सुधारीत अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अज्ञात वाहन चालकाच्या धडकेत एकाचा औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०६/०२/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील मृतक तुकाराम नत्थुजी शेंडे वय ६० वर्ष हे आपले नास्त्याचे दुकाणात झोपण्याकरीता जात असता, यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वडीलास धडक मारून गंभिर जखमी केल्याने, त्यास औषधोपचारा करीता उपजिल्हा रूग्नालय साकोली येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने, फिर्यादी कैलाश तुकाराम शेंडे वय ३० वर्ष रा. पटाची टोली पिंकेपार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४,(अ) भादवी. सहकलम १३४(अ),(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०१/२०१८ ते दि. ०७/०२/२०१८ चे ०७.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही दि. २५/०१/२०१८ ते दि.०७/०२/२०१८ पर्यंत बहिनीचे लग्न असल्याने १५ दिवस अर्जीत रजेवर नागपुर येथे गेले होते फिर्यादी ही घरी हजर नसतांनी कोणीतरी अज्ञात चोराने, आऊट लेटची लोखंडी खिडकी तोडुन खिडकीचे रस्त्याने घरात प्रवेश करून, चोरी करण्यास गेला परंतु कोणतीही किमती वस्तु चोरून न नेल्याने, फिर्यादी सौ. दलजीत कौर मनीपालसिंग जज वय ३७ वर्ष रा. प्रितम विहार अपार्टमेंट फ्लॉट न.२०२ ऑटोमोटीव्ह चौका जवळ कामठी रोड नागपुर ह.मु. सिव्हील लाईन भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मंदीरातील मुर्तीच्या डोक्यावर असलेला चांदीचा मुकुट व छत्री ची चोरी गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०२/२०१८ चे ०७.३० ते १८.०० वाजता दरम्यान यातील गंगामाता मंदीराचे दार खुले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन मंदीराचे आत प्रवेश करून मुर्तीच्या डोक्यावर असलेला चांदीचा मुकुट वजन अंदाजे ७ तोळे तसेच मुर्तीवरील चांदीची छत्री ४५ तोळे असा एकुन ५२ तोळे चांदी कि. २०,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी रमेश विठोबा वंजारी वय ३८ वर्ष रा. अडयाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

५) मोबाईल चोरी करण्याचा प्रयत्न करतांनाी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०७/०२/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घराबाहेरील राजेश चोपकर यांचे किराण दुकाना समोर तिचा व्हीवो कंपनीचा एक मोबाईल कि. ५,०००/रु. चा बाजुला ठेवुन बसली असता यातील आरोपीने फिर्यादीचा मोबाईल घेवुन पळाला व ती त्याचे मागे धावली असता, आजुबाजुचे लोकांनी त्याला पकडले व आरोपीच्या हातामध्ये फिर्यादीचा मोबाईल मिळुन आल्याने फिर्यादी श्रीमती विजया भिमराव सेलोकर वय ५५ वर्ष रा. बोसनगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) कॅरीऑन कंपनीची एम.ई.डी.टि.व्ही. ची चोरी . :–

दिनांक ०६/०२/२०१८ चे १७.०० ते दि. ०७/२/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने जि.प. प्राथमीक शाळा कारधा येथील वर्ग रूमचा लॉक तोडुन आत प्रवेश करून वर्ग खोली भिंतीला असलेली कॅरीऑन कंपनीची ३२ इंच १ एम.ई.डी.टि.व्ही. कि. १२,०००/रु. ची चोरून नेल्याने फिर्यादी सौ. कोमल हेमंत बांडेबुचे वय ५३ वर्ष रा. जि.प. चौक भंडारा मुख्याधापक जि.प.प्रा.शाळा कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०७/०२/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर व ट्रॉली राज्य मार्ग क्र. २७२ चे मध्यभागी उभे करून येणारे जाणा–या लोकांना अडथळा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. भोयर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०७/०२/२०१८ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने व दारूचे सेवन करून तोल जावुन खाली पडलयाने सरतर्फे फिर्यादी सफौ. खोंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८४,१८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सफौ. खोंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

९) महिलेचा मृत्यु . :–

दिनांक ०७/०२/२०१८ चे १३.३० वाजता. यातील मृतक सौ. नम्रता लक्ष्मणराव भोयर वय ५२ वर्ष रा. व्यंकटेश नगर खात रोड भंडारा हिची प्रकुती वातामुळे खराब झाल्याने तीला दि. ०७/०२/२०१८ ला आकस्मीक विभागात मृता अवस्थेत आणले असता डॉ.ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो व पतीचे बयान व सरतर्फे फिर्यादी पोना. शहारे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

१०) अवैध दारु / जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ०७/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,वरठी,साकोली येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू किंमती १०००/–रु, व ४ लिटर १४० मिलीलीटर देशी दारू कि. ३१९७ /रु. तचेस जुगारातुन १७०/रु. असा एकुन ४,३६७/रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०७/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती — ७२ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.